खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

# मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

---

दि. २३-१-२०१९

जळगाव (दि. २३) महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मूळजी जेठा महाविद्यालय यांच्या वतीने मिती क्रिएशन्स, मुंबई प्रस्तुत 'अक्षर त्रिवेणी' हा नृत्य, नाट्य, गीत, संगीत आणि अभिवाचनाचा सांस्कृतिक कार्यक्रम रविवार, दि. २७ जानेवारी २०१९ रोजी शहरातील छत्रपती संभाजीराजे नाट्यमंदिर येथे संध्या. ७ वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती पत्रपरिषदेत बुधवारी दि. २३ रोजी केसीई संस्थेचे सांस्कृतिक समन्वयक शशिकांत वडोदकर यांनी दिली.

२०१८-१९ हे वर्ष मराठीतील प्रतिभासंपन्न साहित्यिक ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे आणि सुधीर फडके यांचे जन्मशताब्दी वर्ष महाराष्ट्रभर साजरे होत आहे. यानिमित्ताने महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभागाकडून महाराष्ट्रात काही मोठे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

'अक्षर त्रिवेणी' या कार्यक्रमाचे संहितालेखन उत्तरा मोने यांनी केले असून या कार्यक्रमात ज्येष्ठ पार्श्वगायक रवींद्र साठे, अभिनेते संजय मोने, तुषार दळवी, गायक नचिकेत लेले, शरयू दाते, रुपाली देसाई, सुगत उथळे, अमित सोळंकी, शोभना मयेकर आणि प्रशांत लळीत यांच्यासह २७ कलाकार सहभागी होणार आहेत.

या कार्यक्रमात पु. ल. देशपांडे यांच्या 'एक झुंज वा-याशी' या नाटकाचा नाट्यांश सादर होणार आहे. सदर कार्यक्रम २.३० तासांचा असून मराठीतील तीनही अलौकिक प्रतिभावंतांच्या साहित्याचा आविष्कार यावेळी आपल्याला पाहता येणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी मा. किशोरराजे निंबाळकर, जिल्हा पोलीस अधीक्षक मा. दत्तात्रय शिंदे, जळगाव शहराचे आमदार मा. सुरेश भोळे, महापौर सीमा भोळे, निवासी उपजिल्हाधिकारी मा. राहूल मुंडके, केसीई सोसायटीचे अध्यक्ष मा. नंदकुमार बेंडाळे उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून शहरातील जास्तीत जास्त साहित्यप्रेमी, रसिकांनी याचा आस्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आलेले आहे. पत्रपरिषदेला मराठी विभाग प्रमुख डॉ. विद्या पाटील, सुभाष तळेले, प्रा. योगेश महाले, गोपीचंद धनगर उपस्थित होते.